जगभर

# प्रासादशिखरस्थोऽपि काको न गरुडायते।

## चन्द्रशेखर पुरन्दरे

दक्षिण कोरिया आणि ब्राझीलच्या अध्यक्षांची भ्रष्टाचाराच्या आरोपांवरून नुकतीच तुरुंगात रवानगी झाली अनुक्रमे २५ आणि १२ वर्षांसाठी. दक्षिण आफ्रिका देशाचा माजी अध्यक्षही याच वाटेवर असावा. त्यामागोमाग जपानचा पंतप्रधान जूनमध्ये या कारणासाठी राजीनामा देईल अशी वदंता आहे. इस्राएलचा पंतप्रधानही भ्रष्टाचाराच्या चौकशीत अडकला आहे. हे सगळे लोकशाही देश म्हणून दखलपात्र. इतर प्रकारच्या राज्यव्यवस्थेत ही शक्यता संभवत नाही. उदा. सौदी अरेबियातील एका कुटुंबाच्या हुकूमशाहीत किंवा चीन-रशियासारख्या एकाधिकारशाहीत किंवा इजिप्तसारख्या लष्करी राजवटीत.

शीर्षकाचा अर्थ - राजवाड्याच्या कळसावर बसला म्हणून कावळा काही गरुड होत नाही. पण हे सिद्ध होण्यासाठी देशाची न्यायसंस्था निष्पक्षपाती, राजकीय दडपणाला न जुमानणारी लागते. ती या सगळ्या देशात आहेच असे म्हणता येत नाही. किंबहुना, ब्राझीलमध्ये संशयाला जागा आहे, ते पुढे स्पष्ट व्हावे.

**दक्षिण कोरिया** आधीच्या एका लेखात नमूद केल्याप्रमाणे, दक्षिण कोरियाच्या (यापुढे कोरिया) अध्यक्षा Park Guen-hye (यापुढे पार्क) आणि त्यांची एक जवळची मैत्रीण यांचे संबंध आपल्याकडील जयललिता-शशिकला संबंधांसारखे घनिष्ठ आणि राज्यासाठी अनिष्ट होते. या मैत्रिणीच्या मार्फत अध्यक्षांनी मोठ्या प्रमाणावर वैयक्तिक पैसा केला. कोरियातील कंपन्यांकडून आलेली ही लाच होती. देशाच्या अंतर्गत गुप्तहेर खात्याने ही लाच अध्यक्षाकडे वळवली. म्हणजे, अनेक संस्था यात गुंतल्या होत्या. द. कोरियात कुटुंब नियंत्रित उद्योग आपल्याकडच्या अंबानी, बजाज, बिर्ला इत्यादींसारखेच आहेत. (या प्रकरणात Samsung या मोठ्या कंपनीचा मालकही तुरुंगात गेला.) सरकारी धोरण आपल्याला अनुकूल व्हावे, परवाने मिळावेत, करात सवलत मिळावी अशा अनेक फायद्यांसाठी हे उद्योग लाच-लुचपत करतात. कोरियाच्या दुर्दैवाने, या आधीचे अध्यक्षही एकामागून एक भ्रष्टाचारी होते. चून-दु-वान (१९८० ते १९८८) , नंतर रो-ते-वू (१९८८ ते १९९३) हे दोघेही पूर्वीचे लष्करी अधिकारी. प्रचंड प्रमाणात सरकारी तिजोरी लुबाडल्याच्या गुन्ह्याबद्दल ते तुरुंगात गेले. (त्यात भर म्हणून त्यांनी विरोधी विद्यार्थी चळवळ हिंसेने दडपली, त्यात अनेक बळी गेले होते). या दोघांवर ही कारवाई १९८८ नंतरच्या अध्यक्षाने केली. (तेव्हाही स्वत:च्या भ्रष्टाचारापासून लक्ष वळवण्यासाठी ही कारवाई त्याने केली झाली असा संशय होता.) या दोन माजी अध्यक्षांच्या शिक्षेनंतर सामान्य कोरियन माणसाचा लष्करशाहीवरचा विश्वास उडाला पण राजकारणी लष्करी असोत किंवा नसोत, भ्रष्टाचारीच राहिले.

प्रथम २०१७ ला पार्कला अटक झाली, नंतर वर्षभरातच आणखी एक माजी अध्यक्ष ली-म्युंग-बाक (१९०८ ते १९१३) याला अशाच आर्थिक गुन्ह्याखाली अटक झाली. आजमितीला कोरियाच्या जिवंत माजी अध्यक्षांपैकी चारजण तुरुंगात आहेत. आणि तीन दिवंगत अध्यक्षांवर दाट संशय आहे. कोरिया हा जगातील आर्थिकदृष्ट्या संपन्न देश आहे. त्याची प्रगती ६०च्या दशकापासून दैदिप्यमान वेगाने झाली. ही प्रगती ज्या अध्यक्षाखाली झाली, तो लष्करशहा होता (१९६० ते १९७९). आता अटकेत गेलेल्या पार्कचे ते वडील. त्यामुळे आपण अध्यक्ष होणे हा जन्मसिद्ध हक्क असल्यासारखे बाईंचे वर्तन राहिले. (या 'जन्मसिद्ध' अधिकाराचे प्रतिध्वनी आपण नेहरू-गांधी घराण्यामध्ये ऐकत आलेलो आहोत.) त्यांच्यावरच्या चौकशीला त्यांनी सहकार्य केले नाही. आपल्या विरोधात जाऊ शकेल म्हणून एका न्यायाधीशाला वगळण्याचा प्रयत्न मात्र केला. तोच उद्धटपणा लीने दाखवला. ('आणीबाणी'). नेतृत्वाच्या अशा वर्तनामुळे सामान्य जनतेचा लोकशाही या व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होतो हा संकेत गंभीर आहे. कारण आपले काही चुकले हेच या व्यक्तींना मान्य नसते. कायदा सामान्यांसाठी, आपण त्याच्यावरचे हा दंभ कोरियात लयाला गेला हे महत्त्वाचे.

**दक्षिण आफिका** नेल्सन मंडेला या राष्ट्रपुरुषानंतर द. आफ्रिका देशाचे नेतृत्व त्या उंचीला जाऊ शकले नाही. अलीकडचा अध्यक्ष जेकब झुमा याची कारकीर्द ('०९ ते '१८) तर आजवरची सगळ्यात भ्रष्ट कारकीर्द होती. वैयक्तिक संपत्ती (कित्येक अब्ज डॉलर्स) मिळवण्यासाठी झुमाने सरकारी पदाचा गैरवापर केला. गेल्या काही वर्षांपासून त्याविरुद्ध संसदेत व रस्त्यावर असंतोष होता. त्याच्यावर संसदेत अनेकदा अविश्वास ठराव आणण्याचे प्रयत्न झाले. त्याने कशालाच दाद दिली नाही पण अखेर लोकांच्या विरोधापुढे आपण टिकू शकणार नाही आणि नवीन अविश्वासाचा ठराव आपल्याविरुद्ध जाण्याची शक्यता लक्षात घेऊन त्याने नाखुशीने फेब्रुवारीत राजीनामा दिला.

हे प्रकरण अनेक वर्षे चिघळत असले तरी त्याला निर्णायक

वळण अलीकडे मिळाले. गुप्ताबंधू म्हणून भारतीय वंशाच्या 'उद्योजकां'चे द. आफ्रिकेत मोठे आर्थिक जाळे आहे. या बंधूंशी झुमाची विशेष जवळीक होती. ती जवळीक अखेर लोकांच्या इतकी डोळ्यावर आली, की ''झुप्ता'ला हाकला' अशी मोहीम सुरु झाली.

झुमा-अधिक-गुप्ता म्हणून 'झुप्ता'.

गुप्ता मंडळींच्या हितसंबंधियांना सरकारी मालकीचे उद्योग बहाल करणे व त्यातून स्वत:साठी पैसा मिळवणे हे झुमाचे तंत्र. त्यासाठी त्याचा मुलगा व गुप्ता यांची भागीदारी. यातून सरकारी तिजोरीतून पैसे गायब करण्यात आले हा विरोधकांचा प्रमुख आरोप. झुमाचा प्रयत्न त्याच्या (सहापैकी) एका बायकोला आपल्यानंतर पक्षाचा अध्यक्ष व नंतर राष्ट्राचा अध्यक्ष करण्याचा होता. तो अयशस्वी तर झालाच, पण आता त्याच्यावर आठशेहून अधिक गुन्हेगारी आरोप आहेत.

**ब्राझील** ब्राझीलचा माजी अध्यक्ष लुला हा १२ वर्षासाठी एप्रिलमध्ये तुरुंगात गेला. त्याचे प्रकरण वरीलपेक्षा जरा निराळे आहे. तो स्वत: कमालीच्या गरीबीत वाढला, रस्त्यावर बूट-पॉलिश करण्यापासून सुरुवात करून मग मजूर संघटनातून वर आला. अनेकदा राष्ट्राध्यक्षाची निवडणूक हरल्यानंतर २००२ ला राष्ट्राध्यक्ष झाला, तो २०११ पर्यंत. त्याची कारकीर्द विवाद्य राहिली. अनेक लाख ब्राझिलियन्स त्याच्या सामाजिक योजनांतर्गत गरीबीतून बाहेर आले, ब्राझील जागतिक प्रगती-नकाशावर आला हा एक दावा. त्याचवेळी तो वरवरची मलमपट्टी करत आहे, गरीबीच्या खऱ्या कारणांपर्यंत जात नाही अशी टीका होऊ लागली. अधिक गंभीर म्हणजे, तो व त्याचे सहकारी यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोपही होऊ लागले. पेट्रोब्रास या मोठ्या ब्राझिलियन तेल-कंपनीच्या व्यवहारात त्याने ढवळाढवळ केली व पैसे खाल्ले; अनेक ब्राझिलियन कंपन्यांना त्याने परदेशी गुंतवणूक करायला भाग पाडले, पक्षाला पैसे मिळावेत म्हणून त्यांच्यावर दडपण आणले, काळ्या पैशाची बरीच उलाढाल केली, वगैरे. कोर्टाने यातील काही आरोप ग्राह्य धरून त्याला १२ वर्षांचा तुरुंगवास दिला. तुरुंगात गेला तरी तो आज ब्राझीलमधील सर्वात लोकप्रिय नेता आहे. तेथे ऑक्टोबरमध्ये निवडणुका अपेक्षित आहेत. त्याला त्यात भाग घेता येईल का नाही हे आज सांगता येत नाही. पण ज्या उमेदवाराला तो पाठिंबा देईल तो निवडून येणे शक्य आहे.

द. कोरियात पार्कच्या बाजूने व विरुद्ध निदर्शने झाली. त्यात दोन पिढ्यातील अंतर स्पष्ट दिसले. वयस्क पिढी पार्कच्या बाजूने होती कारण त्यांना तिच्या वडिलांचा करिष्मा व कर्तृत्व मान्य होते (जवाहरलाल-इंदिरा). तरुण पिढी भ्रष्टाचाराने अस्वस्थ होती व तिच्या विरुद्ध होती. असेच उभे विभाजन ब्राझीलमध्ये दिसते. 'डाव्या' जनतेचा लुला हा नेता. विरुद्ध अर्थातच उजवा कौल - त्यात ब्राझीलचे लष्करही आले. त्यांनी '(लुलाच्या अटकेविरुद्ध) फार निषेध केलात, तर लष्कराला हस्तक्षेप करावा लागेल' अशी धमकी द्यायला सुरुवात केलीच आहे. (ब्राझील १९८५ पर्यंत २०-२२ वर्षे लष्करी आधिपत्याखाली होता, ती आठवण ताजी आहे. त्या संदर्भात ही धमकी).

पण, आपल्या दृष्टीने महत्त्वाचा मुद्दा म्हणजे काही लोक उजव्या असो, डाव्या असो, कोणत्याही सरकारविरुद्ध त्या सरकारची धोरणे जर जनहितविरोधी असतील, तर उभे राहतात. प्रसंगी निष्प्रभ विरोध करतात. हे निषेध ब्राझीलमध्ये २०१३ पासून चालू आहेत कारण लुला-राजवटीची 'डाव्या' विचाराची छिद्रे तेव्हा दिसू लागली होती.

द.कोरिया व द. आफ्रिका ही त्या मानाने काळी-पांढरी समीकरणे आहेत. अमुक एकाने पैसा खाल्ला, ते सिद्ध झाले, मग तुरुंगवास. ब्राझीलमध्ये दृश्य तितके सरळ नाही. कारण पैसा खाल्ला का नाही हे ठरवणारी न्याय-संस्था पूर्णत:विश्वासार्ह नाही. न्याय-संस्था लष्करी दडपणाखाली वागत असेल असा संशय घ्यायला जागा आहे. मग त्या खोल व खऱ्या अर्थाने ती लोकशाही कमकुवत ठरते. उदा. असा संशय तुर्कस्तान. पाकिस्तान या तथाकथित लोकशाहीतही येतो.

**जपान आणि इस्राएल**

हे दोन्ही देश विकसित लोकशाही. त्यामुळे विकसनशील देशांपेक्षा येथे परिस्थिती बरी असावी अशी अपेक्षा असते.

पण जपानचा सध्याचा पंतप्रधान किमान दोन प्रकरणात अडकला आहे. त्याने ओसाका शहरातील सरकारी मालकीचे महागडे भूखंड बायकोच्या मित्राला जवळ जवळ फुकटात दिले. त्या कागदपत्रातून स्वत:च्या व बायकोच्या नावाचे उल्लेख नंतर वगळण्यात आले. दुसरे प्रकरण म्हणजे एका मित्राला एक कॉलेज काढायला खास परवानगी दिली. या प्रकरणांमुळे त्याची लोकप्रियता घसरली आहे आणि त्याचे नेतृत्व पक्षाला निवडणुकीत महाग पडेल असा आता पक्षांतर्गत मतप्रवाह आहे.

इस्राएलचा पंतप्रधानही अनेक प्रकरणात गुंतलेला आहे. आपल्याला अनुकूल कव्हरेज मिळावे म्हणून एका मीडिया कंपनीला विशेष सवलती देणे, त्याच्या प्रतिस्पर्ध्याला दबवणे, महागड्या भेटी स्वीकारणे, आरमारी खरेदीत हात असणे, इत्यादी. त्याची पोलीस चौकशीही चालू आहे.

एकूण लोकशाही देशांतील राजकीय नेतृत्व प्रामाणिक दिसत नाही.

*wwww.art-non-deco.com*
*artnondeco@yahoo.co.uk*